# वडा पाव !

मला नेहमी कुणीतरी छानशी पोस्ट पाठवतं आणि माझ्यातल्या लेखिकेला आव्हान देतं. ह्याकरीता प्रथम तुम्हा सर्वांचे आभार ! अशीच एक वडा पाव वरील पोस्ट आली आणि माझ्यातील लेखिकेला माझ्या भावना गद्यातून आणि पद्यातून लिहायची उर्मी देऊन गेली.

वडा पाव !

(आशा अग्निहोत्री version always Realistic)

Honestly वडा पाव Bombay - Poona travel मध्ये पूर्वी train ने जाताना कर्जतला आणि आता car ने जाताना दत्त मध्ये किंवा असाच कुठेतरी कुणी खाणार का? विचारलं की वाटत परत कशाला त्या जुन्या आठवणी?

शाळेत १५ पैशाला मधल्या सुट्टीत बऱ्याच मैत्रिणी ‘भगिनी समाजच्या’ कॅन्टीनचा वडापाव खायच्या. काहीजण इंग्लिश medium च्या ‘दिवाडकर-कुलकर्णी’ कॅन्टीन मध्ये जाऊन तो जास्त चांगला असतो म्हणून २५ पैसे देऊन खायच्या. मग रुईया कॅन्टीन मध्ये मैत्रिणी रांगा लावून विकत घ्यायच्या. त्यांनंतर अकॅडेमीच्या कॅन्टीन मध्ये माझा जवळ जवळ सर्व वर्गच मी सोडून वडापाव चहा नाश्ता करायचे. Ideal च्या गल्लीतल्या ‘श्री कृष्णच्या’ वडापावच्या घमघाटात तर कित्येकदा secondhand bookstore मधून पुस्तकं घेतली. कारण Ideal ची नवीन कोरी पुस्तकं परवडणं अशक्य होतं. नाटेकर सरांचं ऑफिस Ideal च्या मागच्या गल्लीत होत आणि मी तिथे ५ वर्षं first year ते fifth year architechture काम करत होते. दर पंधरवड्याला ऑफिस मध्ये तोच घमघमणारा वडापाव आणि मग चहा मागवला जायचा. सर्व स्टाफ अगदी आतुरतेने ह्या fortnight celebrationची वाट पहायचे. पण का कुणास ठाऊक मला तो वडापाव एवढा आकर्षित नाही करायचा. एकदा academy च्या शेवटच्या वर्षात मी माझ्या काही मैत्रिणींना वडापाव चहा अशी कॉलेज canteen मध्ये feast दिली होती. मनात उद्दिष्ट एव्हढेच आपल्याला न परवडलेला आणि सर्वांना प्रिय पदार्थ ह्याची feast college संपतांना द्यायची. पण आज विचार केला तर वडा पाव चे आकर्षण नव्हतेच असे जाणवते.

सगळ्यात कहर म्हणजे माझ्या आईच्या हातचा वडा पाव ही आमच्या बहुतेक नातेवाईकांची फर्माईश असायची. रोज तर पै पाहुणा असायचाच पण पाहुण्यांचे वाढदिवस, सण, कोडकौतुक आईच्या वडापाव, शिरा आणि अनेक कप चहा यांनी केले जायचे. आईने बनविलेल्या वड्याच्या मिश्रणात हळद

नसायची आणि तो खूपच सपक असायचा असे मला वाटायचे. मी आईला अनेकदा सांगितले, मला विकत मिळतो तसा निदान माझ्यापुरता तरी वडा बनवून दे, पण तिने तिची receipe कधीच बदलली नाही.

आता प्रत्येक वेळी Bombay - Poona travel करताना किंवा परदेशातून परत येताना माझा मुलगा आणि माझा नवरा पहिल्या थांब्याला आधी वडापाव आणि चहा घेतात आणि म्हणतात," व्वा, आता बरं वाटलं ! Indial ला आलो असं वाटतंय".

मला मात्र खिशात दमडी नसतानाही वडापाव ह्या पदार्थाचे आकर्षण वाटले नाही किंवा खिशाला परवडते असे वाटल्यावरही चवीने खावेसे वाटले नाही.

ह्या वडापाववर काही पंक्ती मात्र सुचल्या.

वर्तमानपत्राच्या पुरचुंडीत

लसणाच्या चटणीने लबडलेला

कागद तेल टिपत टिपत

पावाच्या पोटात कोंबलेला

त्याच त्याच तळणीच्या वासाने

वडयाचा दर्प नासिकेत घुसलेला

हस्त स्पर्शाने पकडीत

मुखकमलाने लचके तोडत

खाल्यावर कागदाचा बोळा

तेलाच्या टिनपाट कचरा कुंडीत भिरकावीत

तेलकट हात अंगवस्त्राला पुसायचे

उर्वरित दिनक्रमाचा आराखडा बांधीत

बेफिक्री विसरून निघायचे

टपरिवरल्या माठातले पाणी

ओशट पेल्यातून प्यायचे

पाकिटातून सुट्टे पैसे देऊन

परत वरचे सुट्टे पैसेच घ्यायचे

उर्वरित दिवस करपट ढेकर देत घालवायचा

रंध्रातून वडापावचा दर्प साठवून ठेवायचा

मला कधीच नाही जमले

वडापाव संस्कृतीत नाही मी रमले

**आशा अग्निहोत्री.**

मित्रमैत्रिणींनो, मला ही खलील सुंदर पोस्ट व्हाट्सअप्प वर प्राप्त झाली। ज्याने मला वरील लिखाण स्फुरले -
बातमी
दादर स्टेशनसमोर एका माणसाने वडा-पाव खाल्ला.
ही बातमी विस्ताराने लिहा...

***

नवकथा

मुंबईतला कुंद, घामट उन्हाळा. दादर स्टेशनवर तो उतरला तेव्हा सकाळी घातलेला पांढराशुभ्र शर्ट घामाने पार चोळा-मोळा होऊन गेला होता. त्याला वाटलं आपलं आयुष्य देखील ह्या शर्ट सारखंच मुंबईत पहिल्यांदा आलो तेव्हा असंच परीटघडीचं होतं, गेल्या काही वर्षांत इतके धक्के खाऊन तेही लोळा-गोळा होऊन पडलंय. पाय ओढत तो पुलाकडे चालायला लागला. फलाटावरचं गोल घड्याळ जणू डोळा वटारून त्याच्याकडे रागाने बघत होतं. अचानक त्याला जाणवलं, आपल्याला खूप भूक लागलीये, पोट जाळणारी, रौद्र भूक. लहानपणी माय कामावर गेली की शाळेतून आल्यावर लागायची तशी खवळलेली भूक. तो पुलाखालच्या वडा-पावच्या टपरीवर थांबला. तिथला माणूस मोठ्या काळ्याकुट्ट कढईत वड्यांचा घाणा तळत होता. गोल, मोठ्ठाले वडे तेलात तरंगत होते. त्याला अचानक लहानपणी आजीने सांगितलेल्या नरकाच्या गोष्टीची आठवण झाली. आजी सांगायची की यमाच्या दरबारी मोठ्या कढया आहेत, उकळत्या तेलाने भरलेल्या आणि त्यात पापी माणसांना तळून काढलं जातं. पुढ्यातल्या कढईतले वडे त्याला एकदम मानवी मुंडक्यांसारखे दिसायला लागले. इतका वेळ पोट कुरतडणारी भूक नाहीशी झाली, पण आपल्या त्या सहा बाय सहाच्या खुराड्यात जाऊन काही बनवायचं त्राण त्याला नव्हतं म्हणून त्याने एक वडा-पाव घेतला आणि चार घासात संपवून टाकला.

***

नवकविता

स्टेशनसमोरची रंगहीन टपरी

पुलाखाली झोपणाऱ्या म्हातारीसारखी

अंग चोरून पडलेली

वडे तळणाऱ्या माणसाच्या

कपाळावर तरंगणारे घामाचे थेंब

ठिबकतायत

पुढ्यातल्या कढईत

टप टप टप

येतोय आवाज

चुर्रर चुर्र

ही खरी घामाची कमाई

पुढ्यातल्या

टवका गेलेल्या बशीतला

वडा-पाव खाताना

त्याच्या मनात येउन गेलं

उगाचच

***

ललित

दुपारची वेळ, मुंबईतला कुंद, तरीही ओल्या फडक्यासारखा आर्द्रतेने भिजलेला उन्हाळा. मी दादर स्टेशनला उतरलो तेव्हा चार वाजले होते. वारुळातून भराभरा बाहेर पडणाऱ्या मुंग्यांसारखी चहुबाजूने माणसं चालत होती. प्रत्येकाची चालण्याची ढब वेगळी, गती वेगळी पण एकत्र पाहिलं तर सगळ्यांची लय एकच भासत होती. मुंबईच्या गर्दीची अंगभूत लय. माझं लक्ष सहज पुलाखाली असलेल्या वडा-पावच्या टपरीकडे गेलं. कधीकाळी पिवळा रंग दिलेली लाकडी टपरी. आता त्या रंगाचे टवके उडाले होते. मागच्या भिंतीच्या निळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर ती पिवळी टपरी उठून दिसत होती, मागे अखंड सळसळतं पिंपळाचं झाड, रंगसंगती खूपच उठून दिसत होती. व्हान गॉगच्या एखाद्या चित्रासारखी. भारल्यासारखा मी त्या टपरीकडे गेलो.

'वडा-पाव द्या हो एक' मी म्हटलं.

'एक का, चार घ्या की', मालक हसून बोलला, आणि त्याने माझ्या पुढ्यात बशी सरकवली. पांढऱ्या बशीत मधोमध ठेवलेला सोनेरी रंगाचा वाटोळा गरगरीत वडा, बाजूला आडवी ठेवलेली एखाद्या सिनेतारकेच्या डाव्या भुवईइतकी बाकदार हिरवी मिरची आणि भोवताली पेरलेला लालभडक चटणीचा चुरा. नुसती ती बशी बघूनच माझ्या तोंडाला पाणी सुटलं. वडा-पाव खाता खाता माझ्या मनाला विचार स्पर्शून गेला, देव तरी कुणाच्या हातात कसली कला ठेवतो बघा!

***

शामची आई व्हर्जन

'शाम, बाळ खा हो तो वडा-पाव', पाठीवरून हात फिरवत आई म्हणाली, 'अरे, वडा-पाव खाण्यात पण धर्मच आहे. बघ तो पाव म्हणजे मानवी शरीर हो आणि आतला वडा म्हणजे आत्मा. वडयाच्या आत बटाट्याचं सारण भरलंय तसा आपल्या अंतरंगात ईश्वर असला पाहिजे. अरे वड्याशिवाय का पावाला किंमत असते? तसे आपले शरीर हो. आत आत्मा नसला की केवळ पिठाचा गोळा!'

***

जी. ए. कुलकर्णी व्हर्जन

रामप्पाच्या हाटेलातला कढईखाली धडधडून पेटलेला जाळ. लाल-पिवळ्या लसलसत्या जीभा वरपर्यंत गेलेल्या. काळ्याकुट्ट कढईत उकळणारा तेलाचा समुद्र आणि एका टोकाला वाकडा झालेला झारा घेऊन वडे तळणारे ते सतरा-अठरा वर्षांचे पोर. वातीसारखे किडकिडीत, डोक्यावर केसांचे शिप्तर आणि डोळ्याच्या कोपऱ्यात साचून राहिलेले वावभर दुःख. तो दुकानापुढल्या बाकड्यावर येवून बसला तेव्हा त्या पोराने त्याच्याकडे नजर उचलून नुसते पहिले. तेव्हढ्यानेच त्याच्या काळजाला किती घरे पडली. मुंबईत आल्याला आपल्याला पाच वर्षे झाली नव्हे, हे पोरही अजून तिथेच आहे आणि आपणही इथेच आहोत, त्याच्या मनाला तो विचार नकळत सुई टोचल्यासारखा टोचून गेला. एक दीर्घ सुस्कारा सोडत त्याने बका-बका वडा-पाव खायला सुरवात केली.

***

गो. नि. दांडेकर व्हर्जन

हिते पडघवलीस काही मिळत नाही हो, पण मुंबईस मिळतो म्हणे वडा-पाव का कायसा. आमचा आबा असतो ना, मुंबईस शिकावयास, तो जातो म्हणे कधी कधी खावयास. कसली मेली अभद्र खाणी. गुजभावजींस विचारू जावे तर ते गडगडाट करीत हासतात नी म्हणतात, ‘आगो वयनी, वडा म्हणजे आपला बंदरावर शिदुअण्णाच्या हाटेलात मिळतो तो बटाटावडाच गो’. असेल मेला, आम्ही बायका कधी कुठे गेलोत हाटेलात चरायला म्हणून आम्हाला कळेल?

***

ग्रेस व्हर्जन

विषुववृत्तावरून एक सोनेरी पक्षी आला आणि एक पीस मागे ठेऊन गेला. ते पीस फिरलं वडा-पावच्या गाडीवर, काजळकाळ्या रस्त्यावर आणि तिच्या रंगरेखल्या डोळ्यांवर. मग आल्या स्पर्शओल्या निळसर जांभळ्या सुगंधांच्या लाटांवर लाटा आणि तिच्या कबुतरी डोळ्यात उमटल्या पुढ्यातल्या वडा-पावच्या रूपदर्शी प्रतिमा. माझ्या जिभेवर वस्तीला आले चंद्रमाधवीचे प्रदेश आणि वडा-पाव खातानाच्या तिच्या सांद्र आवाजात मी गेलो हरवून, डोहकाळ्या यमुनेत डुंबणाऱ्या रंगबावऱ्या राधेसारखा!

(Source:WhatsApp)